ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No,CGRF/AZ/ U / 241 / 2009 /75 / Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of A . Infrastructrure Ltd., E-41, MIDC, Chikalthana, Aurangabad, (New Connection)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of A . Infrastructrure Ltd. E-41, MIDC, Chikalthana, Aurangabad, (New Connection)*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 25.08.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

*Copy to:-*

*A. Infrastructrure Ltd.,*
*E-41, MIDC, Chikalthana,*
*Aurangabad, (New Connection)*

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२४१/२००९/७५**

**तक्रार दाखल दिनांक :- १०/०८/२००९**
**निकाल दिनांक :- ०५/१०/२००९**

**ए.इनफ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा. लि.,**
**इ - ४१, एम.आय.डी.सी., चिकलठाणा,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१९००१०७२) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०/०८/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/०८/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने चिकलठाणा एम.आय.डी.येथे प्लॉट क्रमांक ई ४१ खरेदी केला आहे.त्या प्लॉटवर त्यांनी एम.आय.डी. चे नाहरकत प्रमाण प्रत्र जोडुन कारखाण्याच्या उभारणीकरीता सिंगल फेज विद्युत पुरवठा मिळण्याबाबत महावितरणचे चिकलठाण उपविभागीय कार्यालयात दिनांक ०३/०६/२००९ रोजी अर्ज सादर केला. महावितरणचे संबंधित कार्यालयांने अर्जाबाबत कोणतीही कार्यवाही न करता अर्जदारास महावितरणचे अधिक्षक अभियंता औरंगाबाद शहर परीमंडल यांचे कडुन अर्जदारावर कोणतीही थकबाकी प्रलंबित नसल्याबाबत पत्र दाखल करण्यास दिनांक २३/०६/२००९ रोजी पत्र लिहून कळविले. अर्जदाराने वरील जागेवर यापुर्वी आपल्या नांवावर कोणतेही कनेक्शन नसल्यामुळे थकबाकी प्रलंबित असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे सांगुन महावितरण कंपनी नवीन कनेक्शन देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे मरा.विज नियामक आयोगाने दिलेल्या कृती व मानकानुसार विद्युत कनेक्शन देण्याबाबत विज कंपनीस आदेश देण्याचे व मुदतीत कनेक्शन न दिल्यामुळे कृती मानकानुसार नुकसान भरपाई मिळवुन देण्याबाबत या मंचास विनंती केली.

२) दिनांक २५/०८/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदाराचे प्रतिनिधी श्री एस.के.पठाण, नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर सहाय्यक अभियंता, श्री वायकोस उपकार्यकारी अभियंता उपविभाग चिकलठाणा उपस्थित होते.नोडल अधिकारी यांच्या सांगण्यानुसार प्लॉट क्रमांक ई ४१ एम.आय.डी. चिकलठाणा येथे यापुर्वी मे. अंजता कपॅसीटरस् प्रा.लि. या नांवाने एच. टी.

कनेक्शन होते.त्या कनेक्शनवर रुपये ३७२१५५.८२ थकबाकी प्रलंबित आहे. ते कनेक्शन दिनांक ०८/०४/१९८८ रोजी कायमचे बंद करण्यात आलेले आहे.वरील जागेवर थकबाकी प्रलंबित असल्यामुळे अर्जदाराचे कनेक्शन प्रलंबित ठेवण्यात आले आहे. अर्जदाराने वरील थकबाकीची रक्कम भरल्यास कनेक्शन देण्यात येईल असे नोडल अधिकारी यांनी सांगीतले.मंचाने नोडल अधिकारी यांना वरील ग्राहकाचा पी.डी. रिपोर्ट,सी.पी.एल.तसेच थकीत बाकीवसुलीबाबत काय प्रयत्न करण्यात आले याबाबतची माहीती सादर करण्यास सांगुन पुढील सुनावणी दिनांक ०५/०९/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०५/०९/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर, सहाय्यक लेखापाल श्री मुंढे व ग्राहक प्रतिनिधी एस.के.पठाण उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी ग्राहकाची सी.पी.एल.,अर्जदार इनफ्रास्ट्रक्चर लि. यांनी जुनी थकबाकी भरण्याबाबत कंपनीकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत, अधिक्षक अभियंता औरंगाबाद यांनी मुख्य कार्यालयाकडे पाठविलेला प्रस्ताव तसेच कंपनीचे परिपत्रक क्रमांक ७०८ व ६६९ सादर केले. अर्जदाराने सादर केलेल्या जबाबानुसार त्यांनी एम.आय.डी. चिकलठाणा येथे प्लॉट खरेदी करतेवेळी तेथे कोणतेही कनेक्शन नव्हते.म.रा.नियामक आयोग विनियम २००५ चे कलम १०.५ नुसार मालमत्ता खरेदी करणारास जुन्या पी.डी. कनेक्शनची केवळ सहा महीन्याचीच थकबाकी भरणे बंधनकारक आहे. मे. अंजता कॅपसीटरस् कंपनीकडे पी.डी करतांना ८०९०३.४४ रुपये थकबाकी असतांना ३७२१७५.८२ रुपये थकबाकी प्रलंबित कशी दाखविली याबाबत प्रश्न उपस्थित केला व नोडल अधिकारी यांनी चुकीची माहीती मंचास सादर केली असे प्रतिपादन केले.मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाकडे प्रलंबित असलेली थकबाकीची नीश्चीत रक्कम सादर करण्याचे सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रा वरुन असे दिसुन येते की,अर्जदाराने चिकलठाण एम.आय.डी.येथे प्लॉट खरेदी केल्यानंतर नविन कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज केला असता त्यांना वरील जागेवर मे. अंजता कपॅसीटरस् या जुन्या ग्राहकाची व्याज व दंड मिळुन थकबाकी रुपये ८०९०३.४४ प्रलंबित असल्याबाबत महावितरण कंपनीकडुन सांगण्यात आले.अर्जदाराने वरील प्रलंबित थकबाकी व्याज व दंडाची रक्कम कमी करुन दिल्यास एकरकमी भरण्यास तयार असल्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ०४/१०/२००७ रोजी अर्जाव्दारे महावितरण कंपनीस दिला. महावितरण कंपनीने अर्जदाराचे विनंती अर्जानुसार प्रस्ताव तयार करुन मंजुराती करीता मुख्य कार्यालय मुंबई येथे सादर केला. वरील प्रस्तावा नुसार असे दिसुन येते की,मे.अंजता कपॅसीटरस् यांचे कनेक्शन थकीत बाकी न भरल्यामुळे दिनांक ०६/०७/१९८७ रोजी तात्पुरते बंद करण्यात आले त्यावेळी ग्राहकाकडे रुपये ३५१७५.७५ थकबाकी प्रलंबित होती. त्यामध्ये ३४९४०.६० ही मुळ देयकाची रक्कम असुन २३५.१५ रुपये विलंब आकार दाखविण्यात आला आहे. वरील कनेक्शन दिनांक ०४/०८/१९८८ रोजी कायमचे बंद करण्यात आले त्यावेळी व्याजासह एकुण थकबाकी ८०९०३.४४ रुपये दाखविण्यात आली.प्रस्तावामध्ये मे १९८८ ते एप्रिल २००८ या कालावधीकरीता व्याजाची आकारणी रुपये २९१२५२.३८ दाखवुन एकुण ३७२१५५.८२ रुपयाचा प्रस्ताव तयार करुन तो मुख्य कार्यालयाकडे पाठविल्याचे दिसुन येते.या शिवाय महावितरण कंपनीने मे. अंजता कपॅसीटरस् यांच्यावर न्यायालयीन खर्चासहित रुपये ९७२१०.८५ वसुली चा दावा सीव्हील कोर्ट औरंगाबाद येथे दाखल केल्याचे दिसुन येते.वरील दाव्याचा क्रमांक २५२/९० आहे.

५) चौकशीच्या दरम्यान नोडल अधिकारी यांना वरील कनेक्शन पी.डी. झाल्यानंतर व्याजाची आकारणी कोणते नियम व परिपत्रकाव्दारे करण्यात आली ते सादर करण्यात सांगीतले असता याबाबत ते काहीही सादर करु शकले नाहीत. यावरुन असे दिसते की,अर्जदाराने जुनी थकबाकी रुपये ८०९०३.४४ एकरकमी भरण्याची तयारी दर्शविल्यानंतर महावितरण कंपनीने नियमात कोणतीही तरतुद नसतांना रुपये ३७२१५५.८२ चा प्रस्ताव

त्यांचे मुख्य कार्यालयात सादर केला व वरील रक्कम प्रलंबित असल्याचे कारण दाखवुन अर्जदाराचे कनेक्शन रोखुन ठेवण्यात आले.नोडल अधिकारी यांनी सादर केलेल्या मे.अंजता कपॅसीटरस् यांचे सी.पी.एल. वरुन ग्राहकाकडे टी.डी.च्या तारखेस (०६/०७/१९८७) रुपये ३५१७५.७५ व पी.डी.च्या तारखेस (०८/०४/१९८८) रुपये ५२३०९.१८ थकबाकी दाखविण्यात आली आहे.नोडल अधिकारी यांनी महावितरण कंपनीचे वाणिज्य परिपत्रक क्रमांक ५३ दिनांक ०७/०५/२००७ सादर केले आहे.त्यानुसार कंपनीने जुन्या थकीत बाकी वसुलीबाबत सर्वोच्य न्यायालयाच्या आदेशा पर्यंत वरील प्रकरणी तात्पुरता विद्युत पुरवठा खंडीत करण्याच्या तारखेपुर्वीच्या सहा महिने पर्यंतच्या कालावधीत पुरवीण्यात आलेल्या वीजेच्या आकारइतकेच देयक नविन ग्राहकाकडुन वसुल करावे अशा सुचना दिलेल्या आहेत.परंतु वरील परिपत्रकानुसार अर्जदारास देयक देण्यात आले नाही.नोडल अधिकारी यांनी मे अंजता कपॅसीटरस् प्रा.लि.यांचेवर कंपनीने दाखल केलेल्या सिव्हील केस क्रमांक २५२/९० च्या निकालाची प्रत मंचास सादर केली. वरील केस चा निकाल दिनांक १९/११/१९९६ रोजी मा.सिव्हील कोर्टाने दिला असुन त्यानुसार कंपनीस ग्राहकाकडुन रुपये ९७२१०.८५ वसुल करण्यास डिक्री मंजुर केली आहे. परंतु महावितरण कंपनीने १३ (तेरा) वर्षात वसुलीबाबत कोणतीही कारवाई केलेली दिसुन येत नाही. वरील प्रकरणात थकीत बाकी वसुलीबाबत महावितरणचे उदासिन धोरण दिसुन येत आहे.

६) भारतीय विद्युत कायदा अस्तीत्वात अल्यानंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने वीज पुरवठा अधिनियम २००५ ( वीज पुरवठा व संहीता) प्रसिध्द केली ज्याचे पालन करणे महाराष्ट्रातील सर्व वीज वितरण कंपन्यांना बंधनकारक आहे. या अधिनियमातील कलम १०.५ नुसार महावितरण कंपनीस नविन वीज ग्राहकाकडुन वीज पुरवठा खंडीत केलेल्या तारखेच्या सहा महिने अगोदरच्या जुन्या ग्राहकाच्या वीज वापराची रक्क्म वसुल करता येते. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या सी.पी.एल.वरुन मे.अंजता कपॅसीटरस् यांचा विद्युत पुरवठा दिनांक ०६/०७/१९८७ रोजी खंडीत

करण्यात आला होता त्यावेळी एकुण थकबाकी रुपये ३५१७५.७५ अशी होती. यापुर्वीच्या सहा महिन्याच्या अगोदर म्हणजे फेब्रुवारी १९८७ मध्ये ग्राहकाकडे थकबाकी दिसुन येत नाही.त्यामुळे अधिनियम १०.५ नुसार अर्जदारास रुपये ३५१७५.७५ थकबाकी भरावी लागेल.अर्जदाराने वरील प्रमाणे देण्यात आलेल्या देयकाचा भरणा केल्यास व नविन वीज पुरवठा करण्यासाठी देण्यात येणा-या कोटेशनचा भरणा केल्यास तो नविन वीज पुरवठा मिळण्यास पात्र राहील.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास थकबाकीपोटी रुपये ३५१७५.७५ चे देयक द्यावे.

२) अर्जदाराने वरील प्रमाणे रक्कम भरल्यानंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने पारीत केलेल्या अधिनियम २००५ अंर्तगत कृती व मानके नुसार नविन वीज पुरवठा करावा.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनीने पालन करावे व त्याबाबत मंचास लेखी कळवावे.

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२४१/२००९/७५** **दिनांक :-**

**प्रति,**

ए.इनफ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा. लि.,
इ - ४१, एम.आय.डी.सी., चिकलठाणा,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१९००१०७२)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२४१/२००९/७५ )

आपण दिनांक १०/०/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.